जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

शुक्रवार दि.२२ नोव्हेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ७६

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

### एकनाथ शिंदे-शरद पवार एकत्र येणार?

# शिंदे नेहमीच योग्य दिशेने जातात,आम्ही त्यांचा शर्ट पकडून त्यांच्या मागे जाऊ-संजय शिरसाट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभा निवडणुकीतील जनतेचा कौल मतदान यंत्रामध्ये बंद झाल्यानंतर आता राज्यात कुणाची सत्ता येणार? याविषयी विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संभाव्य युतीचे संकेत दिलेत. यामुळे निवडणूक निकालानंतर राज्याच्या राजरकारणात मोठ्या घडामोडी घडण्याची चिन्हे आहेत.**संजय शिरसाट यांच्या दाव्याने भाजपमध्ये खळबळ:मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शरद पवार यांच्यासोबत जाणार नसल्याचे केले तातडीने स्पष्ट.**संजय शिरसाट यांनी मंगळवारी सकाळी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यात पत्रकाराने त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेनेच्या संभाव्य युतीविषयी प्रश्न केला. त्याला उत्तर देताना संजय शिरसाट यांनी यासंबंधीचा कोणताही निर्णय एकनाथ शिंदे हेच घेतील असे स्पष्ट केले. शरद पवार यांच्यासोबत जायचे की नाही? याचा निर्णय एकनाथ शिंदेच घेतली. आम्हाला त्यावर भाष्य करता येणार नाही. पण शिंदे साहेब नेहमीच योग्य दिशेने जात असतात असा आमचा आतापर्यंतचा अनुभव आहे. आम्ही त्यांचा शर्ट पकडून त्यांच्या मागे जाऊ. ते जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल.एकनाथ शिंदे यांच्या प्रत्येक निर्णयाला आम्ही त्याला बांधिल आहोत. ते जिकडे जातील तिकडे आम्ही त्यांच्यासोबत जाऊ. आम्ही त्यांच्यासोबत अत्यंत मजबुतीने राहू, असे संजय शिरसाट म्हणाले.ते पुढे म्हणाले, विधानसभा निवडणुकीत महायुतीचा विजय निश्चित आहे. निवडणूक निकालानंतर महायुतीचे नेते एकत्र बसून मुख्यमंत्री कोण हे ठरवतील. ७५ टक्के सर्व्हे आमच्या बाजूने आहेत. आम्ही ही निवडणूक एकनाथ शिंदे यांच्या चेहऱ्यावर लढली. त्यामुळे शिंदेच हेच राज्याचे नवे मुख्यमंत्री होतील असा आम्हाला विश्वास आहे. यासंबंधी नितीश कुमार यांचे उदाहरण पाहता येईल. वरिष्ठ नेते यासंबंधी योग्य तो निर्णय घेतील. पण एकनाथ शिंदे ज्या भावनेने काम करतात ते जनतेला आवडले अशी सर्वसामान्यांची भावना आहे.संजय शिरसाट यांनी तत्पूर्वी एका पत्रकार परिषदेला संबोधित करताना कथित व्होट जिहादवर भाष्य केले. विरोधी पक्षांचा व्होट जिहाद सुरू होता. याऊलट आम्ही धर्मयुद्ध लढत होतो. आमचे धर्मयुद्ध सक्सेस झाले. बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है आदी घोषणा प्रचंड यशस्वी झाल्या. हिंदू बांधवांसह सर्वच जातीधर्माच्या लोकांनी महायुतीला पसंती दर्शवली. त्यामुळे या निवडणुकीत आमचाच विजय होईल हे निश्चित आहे. सरकारच्या योजना व त्यांची प्रभावी अंमलबजावणी या सर्व बाबी आमच्या पथ्यावर पडणार आहेत. त्यामुळे मतांची वाढलेल्या टक्क्याचा कौल महायुतीच्याच बाजूने असेल आमचा दावा आहे, असे ते म्हणाले.



# जि.प.दगडवाडी शाळेतील स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी घेतले परिश्रम

### गरजवंत मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणण्याची महत्वपूर्ण भूमिका बजावली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**



विधानसभा सार्वत्रिक निवडणुका २०/११/२०२४ रोजी झालेल्या मतदानाच्या दिवशी दगडवाडी येथील मतदान केंद्रावर प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी दगडवाडी जिल्हा परिषद शाळेतील स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी गरजवंत मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.यामध्ये कु.शिवानी साहेबराव पांडे,कु.शिवानी गजानन पांडे, योगेश बोर्ड, अभिषेक बोर्ड तसेच इङज म्हणून श्री.जी.बी.येवले,श्री.एस.के.वायाळ म्हणून काम पाहिले. मतदान केंद्रावर भेट देणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यानिमित्ताने शाळेतील मुख्याध्यापक श्री पी.बी.सोनुने सर ,शेख सर,श्रीमती वाघ मॅडम, श्रीमती पांडे मॅडम तसेच अंभोरे मॅडम यांनी मुलांच्या कौतुकास्पद कामगिरी बद्दल अभिनंदन केले.

# पैठण तालुक्यात शांततेत मतदान १७ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पैठण । प्रतिनिधी**

ता.२० पैठण तालुक्यामध्ये विधानसभेच्या तीन लाख २३ हजार ३५३ मतदारांपैकी दोन लाख २२ हजार ९४० मतदार राजांनी आपला मतदानाचा हक्क बजावला त्यामध्ये एक लाख पंधरा हजार २८० पुरुष मतदार होते त्याचबरोबर महिलांनी सुद्धा एक लाख सात हजार सहाशे आठ मतदानाचा हक्क बजावला यामुळे पैठण तालुक्यात पुरुषांपेक्षा महिलांची टक्केवारी १८,८४. जास्त असल्याचे दिसून आले याचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शिंदे सरकारची लाडकी बहीण या योजनेमुळे महिलांचा मतदानाची टक्केवारी वाढली आणि हीच टक्केवारी जर शिंदे गटाच्या पारड्यात पडली तर निकाल वेगळाच लागेल अशी चर्चा पैठण तालुक्यात ऐकावयास मिळते पैठण तालुक्यात १५६१०९, महिला आहेत तर पुरुष वर्ग हा १६९२३९ एवढा आहे क्या बात है तर पैठण तालुक्यात महिलांपेक्षा पुरुष वर्गाची संख्या ७ हजार ६२० जास्त आहे परंतु मतदानाचा हक्क बुधवारी २० नोव्हेंबरला महिलांनीच जास्त बजावला आहे पैठण तालुक्यात तृतीय पंथाची ५ संख्या आहे परंतु त्यांनी कोणत्या कारणामुळे मतदानाकडे पाठ फिरवली हे मात्र कोणत्याच पक्षाकडे उत्तर नाही,पैठण तालुक्यात किरकोळ बाचाबाची किंवा इतरत्र मध्यप्रेमी यांचा वाद वगळता सर्वत्र शांततेत मतदान झाले आता पैठण तालुक्यात पुरुष वर्गणी ११५२८० महिला वर्ग१०७६६० या महिला व पुरुष वर्गांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.पैठण तालुक्यातील शिंदे गटाकडून विद्यमान खासदार यांचे पुत्र विलास भुमरे, तर उभाठा गटाकडून दत्तात्रय गोरडे या उमेदवाराबरोबर रासपाचे प्रकाश दिलवाले यांच्यासह तब्बल १७ उमेदवारांचे भवितव्य २० नोव्हेंबर बुधवार रोजी सकाळी सात सायंकाळी सहा पर्यंत तब्बल दोन लाख २२०००, ९४० मतदार बंधूंनी मतदानाचा हक्क बसवून इलेक्ट्रॉनिक मतपेटीत बंद केले आहे त्यामुळे पैठण तालुक्यात खरी लढत शिंदे गटातर्फे विलास बापू तर उभाठा गटांकडून दत्तात्रय गोरडे यांच्यातच टक्कर होणार असल्याचेही चित्र पाहावयास मिळते मतदान झाले आता गावगाव एकच चर्चा आमच्या गावात बांध चालला, काही म्हणतात आमच्या गावात नंबर एक वर मशाल चालली काही ठिकाणी रोलर चाललं पण कोणत्या गावात काय चालले आणि कोण उमेदवार विजयी होणार २३ नोव्हेंबर शनिवारी किमान दुपारचे बारा वाजेपर्यंत जनतेला समजणार आहे त्यामुळे उमेदवाराबरोबरच मतदार राजांच्या मनात सुद्धा धाकधूक सुरू झाली असे पाहावयास मिळते.

# श्री संत योगीराज निवृत्ती महाराज व श्री संत मोतीराम महाराज मंदिरच्या वर्धापनदिनासाठी मदत करण्याचे आवाहन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील श्री संत निवृत्तीनाथ महाराज आणि श्री संत मोतीराम महाराज यांच्या सर्व भक्तांना कळवण्यात येते की श्री संत निवृत्तीनाथ महाराज व श्री संत मोतीराम महाराज यांच्या कलशरोहन सोहळा आणि मूर्ती स्थापना दिनांक १७ डिसेंबर २०२२ रोजी संपन्न झाले. दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम साजरे करायचेअसे ठरले आहे तरी आपण या सर्व कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन श्री संत योगीराज निवृत्ती महाराज व श्री संत मोतीराम महाराज मंदिर कलंबर खुर्द च्या वर्धापनदिन उत्सव सोहळ्यानिमित्त मदत करण्याचे आवाहन ट्रस्टचे प्रमुख संभाजी महाराज मोरे ,गोविंदराव पाटील, सुरेश घोरबांड गुरूजी,चंद्रकांत पाटील ,श्रीराम महाराज गायकवाड ,रामदास पाटील , शंकरराव जंगमे , रावजी पाटील इंगोले, दत्ता सोरगे ,धारोबा गुंडे ,नामदेव पाटील, रामजी तुपेकर ,माधवराव घुमे, आनंदराव नवघरे, नारायण गिरी ,आप्पाराव इंगोले यांनी या सोहळ्यास उपस्थित राहून सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन केले आहे.

# वसुनंदिनी फाऊंडेशन जळगाव यांचा महाराष्ट्र रत्न पुरस्कार सौ.संगिता भामरे यांना जाहीर

लोकनेता न्यूज नेटवर्क **नाशिक । वृत्तसेवा**

दहिवेल ता. साक्री, जि. धुळे येथिल ख्यातनाम कवयित्री पोलिस मित्र पत्रकार मित्र काव्यजनक साहित्य समूह प्रशासक समाजसेविका प्रबोधनकार अनेक पुरस्कारांच्या मानकरी सौ. संगिता अभय भामरे यांना यंदाचा



बहुचर्चित बहुमानांकित वसुनंदिनी फाऊंडेशन जळगाव यांचा २०२४ चा राज्यस्तरीय वसुनंदिनी महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर झाल्याचे निवडपत्र नुकतेच प्राप्त झाले आहे. सदरचा पुरस्कार रविवार दि. ८ डिसेंबर २०२४ रोजी जळगाव येथे विविध मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. या आधी सौ. संगिता भामरे यांना सक्षम महिला पुरस्कार / ज्ञानसिंधु प्रकाशन संस्थेचा हिरकणी पुरस्कार / जागृत महाराष्ट्र न्यूज मुंबई यांचा समाजभूषण तर आदर्श समाज सेविका प्रजासत्ताक अमृत गौरव पुरस्कार २०२४ चा वर्ल्ड व्हीजन संस्था मुंबई याचा नुकताच मिळाला आहे. महाराष्ट्र रत्न पुरस्काराचे स्वरूप मानाचा फेटा बांधून गौरवपत्र ट्रॉफी शॉल श्रीफळ बुके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सौ. संगिता भामरे यांचे साहित्य जगतातून व सामाजिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ड संभाजी पगारे, सौ. पुष्पलता पगारे, सौ वैशालीताई वाणी, श्री अभय भामरे, तान्हाजी खोडे, कवी सुभाष उमरकर राजेंद्र आण्णा गवळी प्रा. डी. टी. पाटील, संजय आहेर , संजीव अहिरे , साहित्यिक कवी साहेबराव तात्या नंदन यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# सोयगाव शहरात ७० टक्के मतदान, आमखेडा जरंडी ला लोकसभेपेक्षा मतदानाची टक्केवारी वाढली



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोयगाव । प्रतिनिधी**

सोयगाव शहरात विधानसभा साठी एकूण मतदार सात हजार २४ पैकी चार हजार९९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजवला आहे यामध्ये दोन हजार५२५ पुरुष व दोन हजार ४०१ महिलांनी मतदानाचा हक्क बजवला आहे त्यामुळे शहरात ७० टक्के मतदान झाले असून आमखेडा, जरंडी मतदान केंद्रावर लोकसभेपेक्षा विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढली असून शहरासह आमखेडा, जरंडी परिसरात बुधवारी आमखेडा येथे एकूण दोन हजार ८९३ पैकी दोन हजार१८७ मतदारांनी हक्क बजावून ११२९ पुरुष व १०५८ महिलांनी मतदानाचा हक्क बजवला आहे ७४ टक्के मतदान झाले आहे जरंडी गावात २७९९ पैकी २११९ मतदारांनी हक्क बजावला आहे ७५ टक्के मतदान झाले दरम्यान मतदानाच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडला नाही सोयगाव पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता शहरात एकूण आठ तर आमखेडा जरंडी येथे प्रत्येकी तीन मतदान केंद्रावर मतदान झाले आहे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी मतदान केंद्रावर भेटी दिल्या होत्या.

# लोकशाहिच्या महोत्सवात मतदान करणा-या दिव्यांगांना जागतिक दिव्यांग दिनी आंदोलन करण्याची वेळ : राहुल साळवे अध्यक्ष बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समिती नांदेड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

खासदारांच्या एम्पीलैड्स आणि आमदारांच्या स्थानिक क्षेत्र विकास निधीतील दिव्यांगांचा दरवर्षीचा ३० लक्ष रूपये खर्च न करताच नांदेड लोकसभा पोटनिवडणुक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूका नुकत्याच पार पडल्या आहेत आणि या महोत्सवात सहभागी होत जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत व लोकशाही बळकट करण्यासाठी नांदेड शहर व संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील दिव्यांग मतदारांनी भरभरून मतदान केले आहे आणि यासाठी जिल्हा प्रशासनाने गृहमतदानासह मतदान केंद्रावर व्हिलचेअरसह इतर सर्व सोयी सुविधा दिव्यांग मतदारांसाठी उपलब्ध केल्या होत्या परंतु आता त्याच दिव्यांग मतदारांना जागतिक दिव्यांग दिनी आक्रोश मोर्चा काढून आंदोलन करण्याची वेळ याच लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाने आणली असल्याचे बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीचे अध्यक्ष राहुल साळवे यांनी आज एका प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. साळवे यांनी म्हटले आहे की,अपंग पुनर्वसन कायदा १९९५ ची तर अमंलबजावणी झालीच नाही परंतु त्यात सुधारणा करून आरपीडबलुडी क्ट २०१६ सुद्धा कागदावरच आहे,यासह महाराष्ट्र राज्याचे महाराष्ट्र राज्य दिव्यांग धोरण २०१८ ची सुद्धा अमंलबजावणी झाली नाही तसेच महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागातील शासन निर्णयांची सुद्धा अंमलबजावणी काटेकोरपणे अद्याप करण्यात आली नाही.आमदार, खासदारासह सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरी स्वराज्य संस्थांकडील दिव्यांगांचा राखीव निधी अखर्चितच आहे. दिव्यांगांना स्वयंरोजगारासाठी जागा. हक्काचे घरकुल, शासकीय अनुशेष भरून काढणे हे केवळ कागदावरच राहिले असल्याचे म्हणत साळवे म्हणाले की यंदाच्या २०२४ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत सर्वच राजकीय पक्षांनी आप-आपला जाहिरनामा प्रकाशीत केला पण त्यात दिव्यांगांसाठी कुठलीच विशेष तरतूद केली नाही. संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मानधन सुद्धा वाढविण्यात आले नसल्याचे साळवे म्हणाले.शासन दिव्यांगांच्या दारी अभियानातुन दिव्यांगांची फसवणूक करणाऱ्या याच शासन प्रशासनाने पुन्हा एकदा दिव्यांगांची फसवणूक मोठ्या प्रमाणात मतदानाच्या रूपात करून घेतल्याचे साळवे म्हणाले, दिव्यांगांना राजकीय आरक्षण मिळावे हि आमची गत १४ वर्षापासून च्या मागणीची राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी खिल्ली उडविली असल्याचे म्हणत याचे पडसाद ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनी नांदेडमध्ये उमटणार असल्याचे राहुल साळवे यांनी म्हटले आहे.

३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनी सकाळी १० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा रेल्वे स्टेशन समोर नांदेड येथुन दिव्यांगांचा आक्रोश मोर्चा निघणार असल्याचे म्हणत नांदेड शहर व संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील दिव्यांगांना या आक्रोश मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन सकल बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समिती नांदेड कडून करण्यात आले आहे.



## संपादकीय..

# अब की बार ट्रम्प सरकार



अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी डेमॉक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांचा पराभव करून ऐतिहासिक विजय प्राप्त केला. ट्रम्प यांना अमेरिकेचे दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष होण्याचा मान मिळाला. अमेरिकन मतदारांचे अफाट समर्थन आणि ज्यो बायडेन व कमला हॅरिस यांच्या विद्यमान सरकारबद्दल असलेली नाराजी निवडणुकीतील मतदानातून प्रकट झाली. ट्रम्प व हॅरिस यांच्यात अटीतटीची लढत होईल, असे राजकीय विश्लेषकांना वाटत होते, प्रत्यक्षात ट्रम्प यांना मतमोजणीत सुरुवातीपासून मिळत राहिलेली आघाडी शेवटपर्यंत कायम टिकली. विजयानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, अमेरिकेला महान बनविण्यासाठी मी प्रयत्नांची पराकाष्ठा करीन, आपण अमेरिकेत सुवर्ण युगाची सुरुवात करणार आहोत.ट्रम्प हे अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष असतील. सर्वात शक्तिशाली राष्ट्राच्या सर्वोच्च अशा राष्ट्राध्यक्षपदाच्या खुर्चीवर ट्रम्प यांना दुसऱ्यांदा बसविण्याचा जनादेश अमेरिकेतील मतदारांनी दिला आहे. अमेरिकेच्या मतदारांनी त्यांच्या हाती अमेरिकेची सूत्रे मोठ्या विश्वासाने पुन्हा एकदा सोपवली आहेत. ट्रम्प यांनी आपल्या विजयाचे श्रेय टेस्ला व स्पेस एक्सचे सीइओ इलॉन मस्क यांना उदार मनाने दिले आहे. इलॉन मस्क यांनी मोठ्या कल्पकतेने ट्रम्प यांची बाजू सोशल मीडियातून मतदारांपुढे सातत्याने मांडली. त्याचा मोठा लाभ ट्रम्प यांना झाला. विजयानंतर डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, ही निवडणूक म्हणजे सर्वात मोठे राजकीय आंदोलन होते. यापूर्वी असे कधी घडले नसावे

प्रत्येक अमेरिकन नागरिक, त्याचा परिवार व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मी अखेरच्या श्वासापर्यंत लढत राहीन. अमेरिकन नागरिकांच्या मुलांचा हक्क असलेला हा देश मजबूत, सुरक्षित व समृद्ध निर्माण करेपर्यंत मी आराम करणार नाही. असे विजयानंतर ट्रम्प यांनी जनतेला वचन दिले आहे. माजी राष्ट्राध्यक्षांनी निवडणुकीत पराभव झाल्यानंतर पुढील अमेरिकच्या इतिहासात १३३ वर्षांनी पुन्हा घडत आहे. म्हणूनच ट्रम्प यांनी मिळवलेला विजय हा ऐतिहासिक आहे. मतमोजणी चालू असताना व ट्रम्प हे सातत्याने मुसंडी मारत असताना ट्रम्प विजयी झाले व कमला हॅरिस पराभूत झाल्याचे फॉक्स न्यूजने वृत्त दिले. जगातील सर्वात मोठी महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदावर डोनाल्ड ट्रम्प यांच्या झालेल्या निवडीचे भारतावरच नव्हे जगातील सर्वच देशांवर काही ना काही परिणाम होणार आहेत. जागतिक घडामोडींवर अमेरिका सतत लक्ष ठेऊन असते व अमेरिकेच्या भूमिकेचा जागतिक घटनांवर परिणाम होतो, म्हणून ट्रम्प यांच्या निवडीला आंतरराष्ट्रीय पातळीवर विशेष महत्त्व आहे. अमेरिकेचे नियोजित अध्यक्ष ट्रम्प व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मैत्री जगजाहीर आहे. ट्रम्प यांच्या विजयाने भारताला निश्चतच लाभ अपेक्षित आहे. भारत– अमेरिका संबंधांना ट्रम्प यांच्या निवडीने नवीन दिशा प्राप्त होईल तसेच या दोन देशांतील संबंध दृढ होतील, अशी भारताला आशा आहे. गेल्या निवडणुकीतही मोदींनी अमेरिकेच्या भेटीवर असताना ट्रम्प यांनाच शुभेच्छा दिल्या होत्या.

अमेरिकेत बाहेरून येणाऱ्या लोंढ्यांविषयी ट्रम्प अतिशय गंभीर आहेत. बाहेरून येणाऱ्या लोकांवर त्यांनी त्यांच्या पहिल्या कारकिर्दीत निर्बंध लादले होते. इमिग्रेशन धोरण व एच १ बी व्हीसा याबाबत त्यांनी पूर्वीचेच धोरण अवलंबले, तर भारतीयांनाही त्याचा जाच सहन करावा लागेल. अमेरिकेत कुशल कामगार म्हणून जे भारतीय जाऊ इच्छितात, त्यांच्यावर निर्बंध येऊ शकतील. मोदी–ट्रम्प यांच्या मैत्रीमुळे भारतीयांना अमेरिकन व्हिसा मिळवताना त्रास होऊ नये, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. ट्रम्प पहिल्या कारकिर्दीत राष्ट्राध्यक्ष असताना २०१९ मध्ये टेक्सास येथे हाऊडी मोदी या जंगी कार्यक्रमात मोदी–ट्रम्प यांची मैत्री जगाने बघितली होती. नंतर ट्रम्प भारताच्या दौऱ्यावर आले असताना मोदींनी अहमदाबाद येथे त्यांच्यासाठी नमस्ते ट्रम्प हा जंगी कार्यक्रम योजला होता. ट्रम्प यांचे धोरण अमेरिका फर्स्ट असे आहे. त्याचा परिणाम भारतातून तेथे जाणाऱ्या वस्तूंवर होऊ नये,याची दक्षता भारताने घेतली पाहिजे. भारतासह अन्य देशांतून अमेरिकेत आयात होणाऱ्या वस्तूंवर ट्रम्प आल्यानंतर मोठे कर लादले जातील अशी भीती व्यक्त केली जात आहे. भारत–चीन संबंध सलोख्याचे नाहीत या मुद्द्यावर अमेरिका–भारत यांच्यात जवळीक होऊ शकते. तसेच अंतर्गत विकास, आर्थिक राष्ट्रवाद व सीमा सुरक्षा या मुद्द्यांवर भारत – अमेरिका यांच्यात देवघेव वाढू शकते. ट्रम्प यांनी नेहमीच दहशतवाद विरोधी भूमिका मांडली आहे, त्यातून पाकिस्तानवर नियंत्रण राहील अशी अपेक्षा आहे. तसेच बांगलादेशात हिंदूंवर झालेल्या हल्ल्यांसंबंधी ट्रम्प यांनी चिंता व्यक्त केली होती. बांगलादेश मुद्द्यावर ट्रम्प यांनी भारताचे खुले समर्थन केले होते.

सन २०१९ मध्ये काश्मीर मुद्द्यावर मध्यस्थी करण्याची ट्रम्प यांनी तयारी दर्शवली होती. मोदींना तसेच हवे आहे, असे अमेरिकेने म्हटले होते. पण भारताने लगेचच अमेरिकेचा दावा फेटाळला होता. आता ट्रम्प यांनी नव्या कारकिर्दीत पुन्हा काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला तर भारताला सावध भूमिका घ्यावी लागेल. ट्रम्प हे चार वर्षे सत्तेबाहेर होते. सतत चौकशी व न्यायालयात चकरा चालू होत्या. त्यामुळे जनतेत त्यांच्याविषयी सहानुभूती निर्माण झाली. तसेच रशिया – युक्रेन युद्धात बायडेन सरकारने घेतलेली लेचीपेची भूमिका लोकांना आवडली नाही. स्वत: बायडेन यांनी अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून माघार घेतली तेव्हा निवडणुकीला तीनच महिने बाकी होते. महागाई व बेरोजगारी या ज्वलंत मुद्द्यावर डेमॉक्रॅटिक पक्ष बचावात्मक राहिला. उलट ट्रम्प यांच्या अगोदरच्या कारकिर्दीत हे मुद्दे सौम्य होते. गेल्या वेळी ट्रम्प यांनी सत्तेत आल्यावर अमेरिकेतील १ कोटी घुसखोरांना बाहेर हाकलून दिले होते. मेक्सिकोच्या सीमेवर सुरक्षा भिंत उभारली. कोणीही बेकायदा अमेरिकेत येऊ देणार नाही, असा प्रचार ट्रम्प यांनी केला. ट्रम्प यांच्या आक्रमक प्रचारापुढे कमला हॅरिस यांचा प्रचार फिका पडला. अमेरिकेतील समृद्धीवर अमेरिकन लोकांचाच हक्क राहील, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे.

# फुकट्यांच्याही देशा...



महाराष्ट्रात सत्ताधारी महायुती आणि विरोधातली महाविकास आघाडी यांच्यात नागरिकांना जास्तीत जास्त गोष्टी, सेवा फुकट देण्याची किंवा थेट पैसे देण्याची जी स्पर्धा चालू आहे; ती एका बाजूला महाराष्ट्राच्या उद्यमशील संस्कृतीची आणि दुसरीकडे, राज्याच्या सामाजिक व सांस्कृतिक वस्त्रपटाची वीण पुरती उसवून टाकणारी आहे. महिला, विद्यार्थी, वृद्ध, बेरोजगार युवक यांच्या रूपात कोट्यवधी नागरिकांचा महाराष्ट्र हातात भिकेचा कटोरा घेऊन उभा आहे आणि संस्थानिकांप्रमाणे हे आधुनिक राजे-महाराजे तिजोरीतून दौलतजादा करीत आहेत; असे चित्र उभे राहते आहे.

जमेल तितके फुकट देणारी दक्षिणेतील राज्ये आणि संगणकापासून सारे मोफत वाटणारी उत्तरेतील राज्ये यांच्यापेक्षा महाराष्ट्राची राजकीय संस्कृती भिन्न होती. ती कष्टकऱ्यांचा, शिकून उद्यम करणाऱ्यांचा किंवा परिस्थितीशी झुंज देत शिकणाऱ्यांचा सन्मान करणारी होती. महायुती सरकारने महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्याचे जाहीर केले; तेव्हा राज्य सरकार भविष्यात या योजनेसाठी कुठून पैसा आणणार, असे विचारून महाविकास आघाडीचे नेते टीका करीत होते. ती योग्यही होती. मग आता आघाडीतले पक्ष महिलांना दरमहा तीन हजार रुपये देण्याचे आश्वासन कशाच्या बळावर देतात? ही फुकटेगिरीची स्पर्धा एक दिवस महाराष्ट्राच्या गळ्याला नख लावेल. 'कल्याणकारी राज्य' या संकल्पनेचा इतका अपभ्रंश आजवर कधी झाला नसेल. महाराष्ट्रातले शेतकरी विपरीत परिस्थितीशी सामना करीत आले आहेत. हवामान बदलाने त्यांची चिंता वाढवली. अशावेळी, सारे कृषी क्षेत्र आणि दूध व्यवसायासहित सर्व आनुषंगिक व्यवसायांना मुळातून ताकद देण्याची गरज आहे. त्यासाठी दूरदृष्टी लागते. दलालांच्या फळ्या तोडून तालुक्या-तालुक्यात कामे उभी करावी लागतात. हे करण्याऐवजी केवळ कर्जमाफी करत राहू किंवा दर काही महिन्यांनी पैसे देऊ; हा दीर्घकालीन टिकाऊ उपाय होऊ शकत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी शेतकऱ्यांची तीन लाखांपर्यंतची कर्जे माफ करू, असे मुंबईतल्या मेळाव्यात सांगितले. पवार हे स्वत: दहा वर्षे देशाचे कृषिमंत्री होते. मग आजही असे कर्जमाफीचे आश्वासन देण्याची वेळ का येते आणि मराठी शेतकरी इतक्या काळात स्वयंपूर्ण का होऊ शकला नाही, याचे उत्तर त्यांनी द्यावे.

काँग्रेसने कर्नाटक, तेलंगण, हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये निवडणुकीत दिलेली आश्वासने पुरी केली नाहीत, असा दावा महायुती करीत आहे. मग आपणही तिजोरीचा विचार

का ठेवू नये? विकासाची निकोप स्पर्धा, विकासाच्या नवीन संकल्पना किंवा समाज कल्याणाच्या मोठ्या योजना यांची चर्चाच प्रचारातून माघारत आहे. महायुतीच्या 'रमण्या'त काय मिळणार आणि महाआघाडी त्या रकमा किती वाढवून प्रत्युत्तर देणार, यांची सार्वजनिक चर्चा म्हणजे समाजाला आपण भिक्षेकऱ्याच्या मानसिकतेत नेत आहोत आणि यातून समाजाचा आत्मसन्मान कायमचा खच्ची होऊ शकतो, याचीही जाणीव या राजकीय पक्षांना उरलेली नाही.

कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेत जे मागे पडतात, त्यांना हात देऊन पुढे आणणे अपेक्षितच आहे. वंचितांच्या किंवा कष्टकऱ्यांच्या हातात थेट अनुदाने दिल्याने पैशाला गळती न लागता लोककल्याणाचे व अर्थकारणाचे भरणपोषण अगदी तळातून होते; हे अनेक अर्थतज्ज्ञांनी सांगितले आहे. मात्र, नेमके वंचित निवडून त्यांना सबळ करणे आणि सरसकट सर्वांवर सवलतींचा वर्षाव करणे; यातला फरकच संपतो आहे. उदाहरणार्थ, सर्व महिला आणि मुलींना मोफत बस प्रवास ही महाविकास आघाडीची घोषणा. महायुती सरकारने महिलांना एसटी प्रवासात निम्म्या भाड्याची

सवलतीच्या पुढे जाणारे आम्ही काही तरी करतो आहोत, या नादात ही पूर्णपणे मोफत बसप्रवासाची घोषणा झाली आहे. आज महाराष्ट्रात लाखो महिला शिकून नोकरी किंवा व्यवसाय करतात. त्या रोज एसटी प्रवास करतात. त्यांना सरकारने अशी मोफत प्रवासाची सवलत देणे अपेक्षितही नाही. तरीही अशा घोषणा करणे म्हणजे समाजाला फुकटेगिरीची निष्कारण चटक लावण्यासारखे आहे.समजा, महिन्याला सरासरी २५ ते ३० हजार रुपये मिळविणाऱ्या एक लाख महिला राज्यभरात उद्या असा फुकट प्रवास करू लागल्या तर या पैशाचा अधिक वंचित असणाऱ्या महिला किंवा समाजगटासाठी होणारा लाभ त्या अडवून धरतात, असा अर्थ होईल. याचा दोष या महिलांना न देता तो असे वायफळाचे मळे फुलविणाऱ्या पक्षांना व नेत्यांना द्यावा लागेल. 'जो जे वांछील, तो ते लाहो..'ची ही स्पर्धा मुळात संपणारीच नाही. उद्या 'घरी येऊन तुम्हाला रोज जेवण भरवतो,' असे म्हणायलाही हे नेते कमी करणार नाहीत. मात्र, अशा अस्थानी औदार्यामुळे महाराष्ट्राचे शरीर व मन कायमचे पंगू होऊन जाईल.

# 'व्हाइट हाऊस' मध्ये ट्रम्पराज!

चार वर्षांच्या कालावधीनंतर रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प हे पुन्हा अमेरिकेचे अध्यक्ष बनले आहेत. त्यांनी स्पष्ट विजय मिळविला असून गेल्यावेळी झाला; तसा गोंधळ किंवा दंगा होण्याची शक्यता नाही. ज्यो बायडेन यांनी अध्यक्षीय लढतीमधून माघार घेतल्यानंतर मूळच्या भारतीय वंशाच्या म्हटल्या जाणाऱ्या कमला हॅरिस या स्पर्धेत उतरल्या. मात्र, कमला हॅरिस या ट्रम्प यांना जबरदस्त तगडी लढत देतील; हा जो अनेकांचा अंदाज होता, तो साफ चुकला आहे.

कमला हॅरिस यांचा मोठा पराभव झाला आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदी महिला आणि भारतीय वंशाची व्यक्ती येण्याचा मुहूर्त आणखी लांबणीवर पडला आहे. कमला हॅरिस यांच्याकडे 'भारतीय' म्हणून अधिक जिव्हाळ्याने पाहणे, राजकीय अप्रगल्भतेचे लक्षण होते. खुद्द हॅरिस यांनाही तसे अपेक्षित नसावे. त्या अध्यक्ष झाल्या असत्या तर त्यांनी भारताच्या पारड्यात काही अधिक टाकले असते, असे समजणेही मूर्खपणाचे होते. अर्थात, भारतात डेमॉक्रॅटिक पक्षाचे समर्थन करण्याची उच्चभ्रू फॅशन आहे. जागतिक संबंधांमध्ये आपल्या देशाचे हितसंबंध किंवा स्वार्थ पाहायचा असतो. डोनाल्ड ट्रम्प यांची निवड ही भारताचे हितसंबंध जपण्यासाठी अधिक उपयुक्त किंवा अनुकूल आहे. तसेही, अमेरिकेचे बहुतेक रिपब्लिकन अध्यक्ष भारताशी डेमॉक्रॅटिक अध्यक्षांपेक्षा तुलनेने बरे वागत आले आहेत.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रम्प यांना आपले मित्र असे अनेकदा म्हटले आहे. खुद्द ट्रम्प यांनी स्वत:ला भारताचा, मोदींचा आणि हिंदूंचा हितचिंतक किंवा मित्र म्हणवून घेतले आहे. विजयाची खात्री असल्याने त्यांनी अलीकडेच 'मी निवडून आल्यावर भारताशी सहकार्य वाढविले जाईल,' असे म्हटले होते. बांगलादेशातील हिंदूंविषयी ट्रम्प यांनी व्यक्त केलेली काळजी केवळ भारत व अमेरिकेतील नव्हे तर साऱ्या जगातील हिंदू समाजाच्या भावना सुखावणारी होती. या साऱ्या पार्श्वभूमीवर दिल्लीत नरेंद्र मोदी आणि वॉशिंग्टनमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांची राजवट असताना पुढची चार वर्षे अमेरिका व भारत यांच्या मैत्रीची वाटचाल होणार आहे.

ट्रम्प हे विश्वासार्ह नाहीत, ते शब्दाला पक्के नाहीत किंवा त्यांना दूर पल्ल्याची जागतिक दृष्टी नाही, अशी टीका होत आली आहे. ती चालू राहील. पण ट्रम्प यांनी युक्रेनमधील युद्धाला आधीपासून विरोध केला आहे. 'मला युद्धखोर म्हणतात. पण मी एकही युद्ध छेडले नाही. उलट थांबविले,' असे ते विजय सभेत म्हणाले. ते खरे आहे. अमेरिकेच्या अध्यक्षांनी ठरविलेच तर युक्रेन युद्ध थांबू शकते. ट्रम्प यांचा विजय होताच रशियानेही तशीच अपेक्षा व्यक्त केली आहे. गाझा पट्टी व परिसरातील युद्ध थांबवा, असे ट्रम्प इस्रायलला वारंवार सांगत आले आहेत. आता ते इस्रायलला होणारा प्रचंड शस्त्रपुरवठा रोखू शकतात, असे म्हटले जाते. असे झाले तर तो इस्रायलला मोठा फटका असेल. पहिल्या अध्यक्षीय कारकीर्दीत ट्रम्प यांनी पाकिस्तानला अनेकदा फटकारले. लष्करी मदत कमी केली आणि दहशतवाद्यांना आश्रय देऊ नका, असेही सुनावले.

ट्रम्प हे मुळात व्यावसायिक असल्याने त्यांचा सगळा भर व्यापारवृद्धी, द्विपक्षीय व जागतिक व्यापारात अमेरिकेचे हित यावर असतो. भारतात असणाऱ्या चढ्या आयात करांबद्दल ते सडकून टीका करतात. व्यापारी संबंध आणि अमेरिकेचे व्हिसा धोरण हे भारत व अमेरिका यांच्यातील संघर्षाचे मुद्दे राहणारच आहेत. मात्र, या कारणांनी व्यापक संबंध कितपत बिघडू द्यायचे किंवा कटू बनवायचे; याचे गणित नेत्यांच्या परस्पर संबंधांवर किंवा संवादावर अवलंबून असते. तसा संवाद ट्रम्प आणि मोदी यांच्यात कायम राहील. ट्रम्प हे थोर तत्त्वचिंतक किंवा विश्वशांतीचे देवदूत नाहीत. पण ते तसे नाहीत, ही भारताची चिंता नाही. 'कार्बन फूटप्रिंट हा निव्वळ बकवास आहे,' किंवा 'आता व्हाईट हाऊसमध्ये अमेरिकेतील बंदूक-मालकांचा सर्वांत विश्वासू मित्र असेल,' ही ट्रम्प यांची विधाने त्यांच्या बेधडक व्यक्तिमत्त्वाला साजेशीच आहेत.

भारताप्रमाणेच अमेरिकेतील राजकारण व सार्वजनिक जीवनही अजून पुरेसे उन्नत नाही; इतकाच या विधानांचा अर्थ आहे. मात्र, डोनाल्ड ट्रम्प निवडून आले म्हणजे जगबुडीची द्वाही फिरली; हा समज करून घेणे किंवा करविणे ही केवळ 'अभिजात नैराश्यवाद्यांना' परवडणारी बौद्धिक चैन आहे. राष्ट्रहिताचा भविष्यवेधी विचार करणाऱ्यांना ती परवडणारी नाही. ट्रम्प यांच्या अध्यक्षीय काळात दक्षिण आशिया आणि आशियातील भारताचे स्थान भक्कम करणे आणि भारताच्या 'सॉफ्ट पॉवर'चा सर्वदूर, सर्वांगांनी विस्तार करणे आवश्यक आहे. भारताचा पराकोटीचा द्वेष करणारे अमेरिकेचे अनेक अध्यक्ष झाले. मग स्वत:ला उघडपणे 'भारतमित्र' म्हणवून घेणाऱ्या अध्यक्षाचे मोकळेपणाने स्वागत का करायचे नाही?

# स्वप्न भंगले प्रेमाचे

माझी आई मला नेहमी सांगायची, तु लहान असतांना तुझ्या खाकी रंगाच्या ढगळ व भोंगळ्या पँन्टीला दोन ठीगळं हमखास असायची. बोदरा सैनचा शर्ट तर कधी पांढरा हरकचा ढगळ शर्ट, बाजरी, मका, ज्वारी, बियानांची खाली झालेली कॉटनची थैली. त्या थैलीत चौकट नसलेली फुटेल पाटी, व फाटेल अंकलिपी , वरच्या खिशात काळ्या पाटीवर गिरवायच्या पांढऱ्या पेंन्सीलचा जाडा भरडा पेंन्सीलचा पांढरा तुकडा

घरी दारी शाळेत गल्लीतल्या संध्याचा हात हातात घेऊन, बालवाडी ते बोर्डाच्या परिक्षे पर्यंत आमचा प्रवास सुखाचा चालला होता. संध्या माझी बालपना पासूनची मैत्रीन !पहिलीत मी अर्ध भोंगळा, तर ती मोठ्या फ्रॉक मध्ये, नंतर नंतर तीसरी चौथी पर्यंत तीच्यासह काही मुली त्याकाळच्या, परकर पोलक्यात यायला लागल्यात. पुढे पुढे पाचवी नंतर माध्यमिक हायस्कूल तिथला युनिफॉर्म सर्वांचा एकच असायचा. मी तर नेहमी प्रमाणे एक खाकी पँन्ट एक पांढरा शर्ट वर्षभर तोच वापरत असे ! घरची परिस्थिती अनुकूल नव्हती.

पणं तीने कधीच श्रीमंतीचा बडेजाव पनाची मिजास कधीच नाही मिरवली.नंतर नंतर ती साडीत, तर कधी कधी भरजरी मोरपंखी शालूत वावरायची. नखशिकांत नटायची. माझ्या घरावरून मुद्दाम फेरफटका मारायची. तेव्हा आम्ही एस. एस. सी. बोर्डाची परिक्षा देऊन, नुकतेच मोकळे झालो होतो.



तीच्या काळ्या कुळकुळीत केसाच्या अंबाडयात मोगऱ्याचा गजरा पाठीमागून तीला शोभून दिसायचा. कोरीव भूवया, काळेभोर डोळे, धारधार नाकाच्या शेंड्याखाली मधाळओठ, उंच हणूवटी खालची लांब मान, सतेज कांती, मोरणी सारखी चाल, हातात बांगड्या, पायात पैंजण, मोरपंखी पदरावरचा रंगीत मोर लांबूनच मला खुनावत असे. एखाद्या राज्याची लावण्यवती दिसत असे खरंच ती लावण्यवतीच होती. शिवाय ती मोठ्या घरची लेक होती.

माझ्या वाटेला, शहरातल्या नातेवाईकांनी वापरलेल्या, पँन्टी, शर्ट, भांडीवाली बाईला न देता, आम्हा भावडांना देत. त्या काळची, न्यारो पँन्ट / बेलबॉटम / एलिफंटा एकना अनेक प्रकारच्या फॅशनच्या पँटा आमच्या पुढ्यात येऊन पडायच्या. त्यातल्या आवडीच्या एक दोन पँन्टी, गावातल्या शिंप्याकडून, मना सारख्या चार दोन रुपयात, ऊधार ऊसणवार करून दुरुस्ती करून घेत असू. कारण परिस्थिती हलाखीची होती. अंगातला ढगळ शर्ट पँटीच्या आत खूपसून, करगोट्याला काडीचा आधार देऊन, पँन्ट टाईट करून, तीच्या सोबत बोर्डाची साथ संगत केली होती. सुट्टीत आमची खूप गट्टी जमायची. मनसोक्त गप्पा मारायचो. हास्य विनोद त्यातच कधी कधी आम्ही एकमेकांना कडकडून भेटायचो. तो निस्पृह, निस्वार्थ आनंद खूप सुख देऊन जायचा. आमचे आचार विचार भाव भावना एक होत्या. तीचे व आमचे कौटूंबिक संबंध स्नेहाचे व प्रेमाचे होते. संशयाला कुठेही जागा नव्हती.

कधी कधी तीच्या सोबत तीच्या शेतात जायचो. चिंचा, बोरे, आंबे मनसोक्त पाडायचो.येथेच्छ खायचो ! आम्ही दोघे एकत्र बांधाबांधा वर हातात हात घालून, शेतशिवारी फिरायचो. आता कुठे ती वीसीत आली होती. तीच्या रंगा रूपात देहात अमुलाग्र बदल जानवायला लागले होते. आता ती खूपच मादक सौंदर्याची खान भासत होती. दोघांनाही शारिरिक आकर्षण खुणावत होते. घडी दोन घडी एकत्र यायचो प्रेमाच्या गोष्टी करायचो हातात हात देत एकमेकांचा निरोप घेत असू.

अडीनडीला शेरपायली धान्य, कधी कधी रोख पैसे माझ्या आईला द्यायची. आईशी देखील ती मनमोकळेपणाने बोलायची. गप्पात रंगायची, कधी कधी घरकामात आईला मदत देखील करायची. म्हणून मला घरातून कसलीच भिती नव्हती. सुन म्हणून आईला पसंत होती.परंतु गरीबीच्या सारीपाटाच्या संसारात तीचा गृहप्रवेश होईल असे वाटत नव्हते . तरी देखील मी आशावादी होतो. माझ्या हृदय पटलावर तीला मानाचे स्थान दिले होते. अचानक जे व्हायला नको तेच झाले. अचानक तीच्या वडीलांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. उगाचंच काही परगंडा होण्याच्या आतच लागलीच त्यांनी तिच्या लग्णाची घाई केली. गावकुसा शेजारील नात्यातील मुलासोबत लग्न ठरवून मोकळे झाले होते. त्या दिवसा पासून संध्याचे बाहेर पडणे बंद झाले होते. आणि एके दिवशी माझी स्वप्न सुंदरी संध्या हातात लग्नाची पत्रिका घेऊन घरी आली. तेव्हा मी तीच्यासाठी एक छानसे प्रेमपत्र लिहायला घेतले होते. पत्र पूर्ण होण्याच्या आतच, तीच्या हातातील कुर्यात सदा मंगलमची पत्रिका बघून मी निशब्द झालो. तीने काही बोलायच्या आतच मला कडकडून मिठी मारली. ढसाढसा रडली. झालं गेलं विसरून जावू. पुन्हा कधी भेट होते न होते ! आजच शेवटचे एकदा भेटून घेऊ ! म्हणून पुन्हा मला कडकडून बिलगली ! आता मात्र दोघांचा अश्रूंचा बांध फुटला होता. आम्ही घेतलेल्या प्रेमाच्या आनाभाकांवर नियतीने अश्रूंचे शिंपन केले होते. हातात पत्रिका ठेवून आल्या पावली परत गेली ती कायमचीच !

एका महिन्याच्या आतच तीच्या गोऱ्या अंगाला हळद लागली. हातावर मेहंदी काढली गेली, हातात हिरवा चुडा, पायात जोडवी, चांदीची पैंजन भाळीच्या गोंदणावर, होणाऱ्या वर्तमान सौभाग्याच्या लेण्याच्या नावाने, ठसठसीत चंद्रकोर लालकुंकू , डोक्यावर भरजरी शालूचा हिरवा पदर सावरत, संध्या बोहल्यावर उभी होती. सनईच्या मंगल सुरात मंगलाष्टक कानी पडत होते. मी तीच्या गतआठवणीत भग्न मंदिराच्या उंबरठ्यावर बसून, प्रेमाची शिदोरी घेऊन प्रेमाचे पाहिलेले स्वप्न भंगले म्हणून, साश्रू नयनांनी आसवांना वाट मोकळी करून देत होतो.

**–साहेबराव नंदन तात्या ताहाराबादकर नाशिक**

### अजित पवार हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील

## जय पवार यांचा दावा; तेच किंगमेकर राहणार असल्याचा व्यक्त केला विश्वास

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**



अजित पवार हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील, असा दावा अजित पवार यांचे सुपुत्र जय पवार यांनी केला आहे. आगामी निकालानंतर अजित पवार हे राज्यात किंग मेकर असतील. तसेच तेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील, असे जय पवार यांनी म्हटले आहे. बारामती विधानसभा मतदारसंघात मतदान केल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला, यावेळी ते बोलत होते.

राज्यातील सर्वात हॉट सीट म्हणून बारामती विधानसभा मतदारसंघाकडे पाहिले जात आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात त्यांचे पुतणे युगेंद्र पवार हे या मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. पवार विरुद्ध पवार अशी थेट लढत या मतदारसंघांमध्ये होत आहे. या मतदारसंघात अजित पवार यांनी विजयाचा दावा केला असला तरी देखील दुसरीकडे शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी युगेंद्र पवार यांना विजयी करण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे या मतदारसंघातील जनता कोणाच्या बाजूने मतदान करणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

या संदर्भात जय पवार यांना विचारले असता त्यांनी अजित पवार यांच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला. इतकेच नाही तर या निवडणुकीनंतर अजित पवार हे किंग मेकरच्या भूमिकेत असतील. तसेच तेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील, असा दावा देखील जय पवार यांनी केला आहे. याआधी देखील छगन भुजबळ यांनी तसेच नवाब मलिक यांनी अजित पवार हे मुख्यमंत्री होतील, असा दावा केला होता. त्यामुळे आता राज्यात कोणत्या पक्षाचे किती आमदार निवडून येतात, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.मुख्यमंत्री पदाबाबत अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना बहुमताचा मुद्दा उपस्थित केला. निवडणूक झाल्यानंतर सर्व आमदार एकत्र बसून मुख्यमंत्री कोण? या बाबत निर्णय घेणार असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले. आम्ही महायुतीचे सर्व निवडून आलेल्या आमदारांची बैठक घेऊ आणि त्यानंतर मुख्यमंत्री कोण होणार हे ठरवू, असे पवार यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर देखील अजित पवार यांनी सर्व अडचणी सोडवण्याचा विश्वास व्यक्त केला. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांच्या सोबत चर्चा करणार असल्याचे अजित पवारांनी सांगितले. शेतकऱ्यांना एमएसपी वाढवून देण्याबाबत आम्ही सकारात्मक निर्णय घेण्याचा आग्रह त्यांना करणार असल्याचेही अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे.

### शरद पवारांनी युगेंद्रला बळीचा बकरा बनवले

## खासदार उदयनराजे भोसले यांची टीका त्यांच्याकडून अपेक्षा बाळगणे अन्यायकारक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बारामती विधानसभा मतदारसंघात युगेंद्र पवार यांना बळीचा बकरा बनवल्याची टीका भाजप खासदार उदयनराज भोसले यांनी केली आहे. शरद पवारांनी ऐन तारुण्याच्या काळात जे केले नाही, त्याची अपेक्षा आता त्यांच्याकडून करणे हे अन्यायकारक आहे, असा घणाघातही त्यांनी यावेळी केला.

उदयनराजे भोसले म्हणाले, बारामती विधानसभा मतदारसंघात पुतण्या युगेंद्र पवार यांनी आपले काका अजित पवार यांना आव्हान दिले आहे. पण तिथे अजित पवारांनी जोरदार काम केले आहे. याऊलट युगेंद्रने परदेशात दिवस काढलेत. त्याने आता तिथेच आपले आयुष्य काढावे. ज्यावेळी काम करण्याची गरज होती, तेव्हा त्यांनी काहीही केले नाही. पवारांनी यावेळी युगेंद्र पवार यांना तिथे बळीचा बकरा म्हणून



उभे केले आहे. शरद पवार आता आपल्याशी गद्दारी केल्याचा आरोप करत आहेत. पण त्यांनी त्यांच्या ५५-६० वर्षांच्या काळात अनेक घोषणा केल्या. पण त्याची पूर्तता केली नाही. ही सुद्धा एक मोठी गद्दारीच आहे.

गद्दारी कुणी केली असेल तर ती काँग्रेस, पवार व या लोकांनी केली. त्यांनी लोकांच्या भावनांचा खेळ केला. त्यामुळे खरे गद्दार तेच आहेत. शिवाजी महाराजांची सर्वधर्म समभावाची भावना होती. लोकांचा राज्यकारभातील सहभाग वाढवण्याचा विचार शिवरायांनी मांडला. पण काँग्रेसच्या सरकारांनी ६० वर्षांत शेतकरी, लष्करी जवान, महिला, तरुण यांच्याविषयी त्यांनी कोणतेही धोरण राबवले नाही. पण मागील १० वर्षांत मोदींच्या नेतृत्वात देशात चांगले सरकार आले. त्यांनी छत्रपतींच्या विचारांना अभिप्रेत असणाऱ्या घोषणा केल्या व त्या आचरणातही आणल्या, असे उदयनराजे भोसले म्हणाले.ते पुढे म्हणाले, विरोधकांच्या तुतारी, मशाल व हाताचा पंजा अशी निवडणूक चिन्हे आहेत. त्यात हाताच्या पंजाचे काय बोलायचे, त्याने आपल्या उमेदीतही काही केले नाही. मशालीवर मशाल हाती घेऊन शोधण्याची वेळ आली आहे. त्यांनीही कोणतेही काम केले नाही. तुतारीच्या पवारांनी केवळ घोषणाबाजी केली. केवळ तुतारी वाजवली. शरद पवारांनी आपल्या ऐन तारुण्यात जे केले नाही ते आता त्यांच्याकडून अपेक्षा करणे अन्यायकारक आहे.दरम्यान, आज राज्य विधानसभेच्या २८८ जागांसाठी मतदान होत आहे. काही किरकोळ घटना वगळल्या तर सर्वत्र शांततेत मतदान पार पडत आहे.

## महिला मतदानाच्या टक्केवारीत वाढ देवेंद्र फडणवीस यांचा दावा:पुन्हा महायुतीचे सरकार येण्याचा विश्वास

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्र मध्ये मतदानाची टक्केवारी वाढली आहे. आजपर्यंतचा अनुभव पाहता जेव्हा जेव्हा टक्केवारी वाढली आहे, तेव्हा तेव्हा भाजप आणि मित्र पक्षाला त्याचा फायदा होतो. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये भाजप आणि मित्र पक्षाचे सरकार स्थापन होईल, असा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. राज्यात वाढलेली मतदानाची टक्केवारी ही महिलांची असल्याचा दावा देखील त्यांनी केला. नागपूर विमानतळावर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला, या वेळी ते बोलत होते.आम्ही मतदारसंघातील बुथ वरील आकडेवारी जमा केली आहे. आणि प्राथमिक फीडबॅक नुसार महिलांची टक्केवारी वाढलेली असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. सत्ता स्थापनेसाठी अपक्ष उमेदवारांची गरज लागेल का? त्यांच्याशी संपर्क साधण्यात येत आहे का? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला होता. मात्र, यावर भारतीय जनता पक्ष आणि आम्ही अद्याप कोणाशी संपर्क साधलेला नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. राहुल गांधी नेहमीच अदानींवर आरोप करतात. त्यात काय नवीन काहीच नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री पदाबाबत आतापर्यंत कोणतीही चर्चा झालेली नाही. निकाल आल्यानंतर तिन्ही पक्ष एकत्र बसून याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल, असा दावा देखील देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. साधारणपणे मतदानाची टक्केवारी ज्या पद्धतीने वाढली आहे. त्यात सरकारच्या बाजूने लोकांचा कल असू शकतो, असा दावा देखील फडणवीस यांनी केला आहे.

### आर्थिक उलाढालीचा परिणाम निवडणुकीवर होणार

## सरकार स्थिर राहील की नाही याची खात्री नाही, एकनाथ खडसे यांची प्रतिक्रिया

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

–महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठीचे मतदान नुकतेच पार पडले आहे. तसेच आता २३ तारखेला मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर आता सरकार कोणाचे येणार यावर तर्कवितर्क लावले जात आहेत. त्यात महायुतीकडून सरकार आपलेच होणार असल्याचा दावा केला जात आहे, तर महाविकास आघाडीने देखील सरकार स्थापनेचा दावा केला आहे. यात आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विधान परिषदेचे आमदार एकनाथ खडसे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

राज्यातील आर्थिक उलाढालीचा परिणाम निवडणुकीवर झाला असल्याचे एकनाथ खडसे म्हणाले आहेत. ज्यांनी ज्यांनी अधिकाधिक आर्थिक व्यवहार केला त्यांना चांगला प्रतिसाद मिळाल्याचे दिसले. काही ठिकाणी आर्थिक व्यवहार झालेही असतील पण लोकांनी ते नाकारले. पण साधारणतः आर्थिक उलाढाल जी झाली, त्या उलाढालीचा परिणाम निवडणुकीवर दिसेल, असे मत एकनाथ खडसे यांनी व्यक्त केले आहे.महाविकास आघाडी किंवा महायुती दोघांनाही या ठिकाणी जर स्पष्ट बहुमत जर नाही आले तर अपक्षांच्या मदतीने सरकार



स्थापनेचा दावा होऊ शकतो. कोणाचेही सरकार आले तरी ते स्थिर राहील की नाही याची खात्री देता येत नाही, असेही एकनाथ खडसे म्हणाले आहेत.दरम्यान, एकनाथ खडसे यांच्या कन्या रोहिणी खडसे यांना मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटकडून उमेदवारी देण्यात आली होती. त्यांच्या प्रचारार्थ एकनाथ खडसे यांनी मतदारसंघात प्रचार देखील केला. तसेच महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा देखील त्यांनी प्रचार केला होता. आता तब्येतीचे कारण देत दगदग सहन होत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. पुढील निवडणूक मी पाहणार की नाही, ते परमेश्वर ठरवेल, असेही एकनाथ खडसे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले होते. त्यामुळे एकनाथ खडसे राजकीय संन्यास घेण्याच्या तयारीत असल्याची चर्चा सुरू आहे.

## सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन मिरजगाव येथे प्रचंड उत्साहामध्ये संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

सत्यशोधक डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने मिरजगाव शहरांमध्ये प्रथमच ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन कर्जत तालुका साहित्य प्रेमी मंडळाच्या वतीने करण्यात आले होते यास प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला

या साहित्य संमेलनासाठी प्रसिद्ध कवी नितीन चंदनशिवे हे संमेलनाध्यक्ष म्हणून लाभले. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वाल्मीक तात्या निकाळजे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे श्री अशोक कुमार शर्मा,उद्धवशेठ नेवसे,संतोष शिंदे, संपादक 'मेजर' भीमराव उल्हारे,पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष तथा दै.लोकनेता,दैनिक प्रभास केसरी चे जिल्हा प्रतिनिधी अण्णासाहेब साबळे,संघर्ष नामा न्युज मिडियाच्या संपादक उज्वला उल्हारे,ड संभाजी दहातोंडे हे होते.संमेलनाचे स्वागताध्यक्ष सुरेश काका गोरखे होते.सकाळी नऊ वाजता श्री सद्गुरु कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ढोल ताशा व लेझीमच्या तालामध्ये मिरजगांव शहरांमधून भव्य ग्रंथ दिंडी काढली.शाहीर बाबासाहेब राजगुरू, तुपे सर व पांडुरंग डाडर यांनी महापुरुषांच्या गीतांचे गायन केले.कु. स्नेहल डाडर यांच्या' मी महात्मा फुले बोलतोय'या महात्मा फुले यांच्या वेशभूषेतील एकपात्री प्रयोगाने प्रेक्षकांची दाद मिळवली.दुपारच्या सत्रामध्ये अंनिसचे राज्य कार्यकारणी सदस्य मा.प्रशांत पोतदार यांनी ' मनोरंजनातून विज्ञान या विषयावरिल व्याख्यानातून काही हात चालाखीने केले जाणारे जादूचे प्रयोग दाखवून सर्वसामान्य भोळी जनता बाबा बापू बुवा यांच्या आहारी कसे जातात हे दाखवून अशा भोंदू लोकांपासून दूर राहण्याचे आवाहन केले .

कवी संमेलनामध्ये अनेक नामवंत कवींनी सहभाग घेतला व आपल्या रचना सादर केल्या.त्यामध्ये प्रवीण घुले,हनुमंत येवले, जेष्ठ कवी 'प्रबोधनकार' महादेव लांडगे , उज्ज्वला जाधव,बालकवयित्री जानवी मंडलिक,गोकुळ गायकवाड, प्रा. विठ्ठल काळे,अलका केदारी , नवनाथ केंदळे,सौ लक्ष्मी लांडगे , शिरीष जाधव,अवंती तनपुरे,शर्मिला गोसावी,पी एन डफळ,ज्योती सोनवणे,चंद्रकांत भैलुमे,सुरेश चव्हाण, जयश्रीताई पोद्दार,दगडू उमाप, सत्यवान मंडलिक,शेलार सर यांनी सादर केलेल्या कवितांना प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद दिली.या संमेलनामध्ये सद्गुरु उद्योग समूहाचे श्री शंकर शेठ नेवसे यांना उद्योग भूषण,प्रसिद्ध साहित्यिक सत्यवान मंडलिक यांना साहित्य भूषण व सौ राजश्री मिनीनाथ गोरे यांना प्रगतशील शेतकरी असे मानाचे पुरस्कार देऊन गौरवण्यात आले . कार्यक्रमाचे आयोजन तानाजी डाडर (अध्यक्ष) सुनील गाडे (कार्याध्यक्ष ) प्रा.देविदास राऊत (उपाध्यक्ष ) दत्ताभाऊ घोडके मोहित सकट संजय शेलार दिनेश आडागळे महेंद्र जगधने चंद्रकांत डोलारे अक्षय डाडर सदाशिव जवणे शत्रुघ्न डाडर निलेश जगधने, रवींद्र गोरे,राघू जगधने,संभाजी डाडर आदींनी केले होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक तानाजी डाडर यांनी तर उपस्थितांचे आभार सुनील गाडे यांनी मानले,कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन विक्रम कांबळे व प्राध्यापक राजेंद्र गायकवाड यांनी केले.



• शुक्रवार दि.२२ नोव्हेंबर २०२४

दैनिक **लोकनेता**



# आष्टी मतदारसंघाची १४ टेबलवर होणार मतमोजणी

## ३०० कर्मचारी नियुक्त ;एकूण ३२ फे-यांमध्ये होणार चित्र स्पष्ट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी शनिवार दि.२३.११.२०२४ रोजी आष्टी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीमध्ये सकाळी ८:०० वाजता सुरू होणार आहे.१४ टेबलवर ही मतमोजणी होणार असून एकूण ३२ फे-यांमध्ये चित्र स्पष्ट होणार आहे.यासाठी जवळपास ३०० कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी वसिमा शेख यांनी दिली.


विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी दिनांक २०.११.२०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर आता सर्वांनाच निवडणुकीच्या निकालाचे वेध लागले आहेत.आष्टी मतदारसंघात प्रथमच चौरंगी लढत होत असून राजकीय स्तरावर विविध लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मतांची आकडेवारी करण्यात व्यस्त आहेत.तर प्रशासनाकडून निवडणुकीच्या मतमोजणी व निकालाची तयारी जोरात सुरू असल्याचे दिसून येत आहे.या अनुषंगाने तहसील कार्यालय व मतमोजणी होत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीमध्ये जय्यत तयारी सुरू आहे.

आष्टी मतदारसंघात ४४० मतदान केंद्रे असून यासाठी एकूण एकूण १४ टेबलवर मतमोजणी होणार आहे. शनिवार दि.२३.११.२०२४ रोजी सकाळी ८:०० वाजल्यापासून मतमोजणी सुरू होईल.एका फेरीत १४ केंद्रांची मतमोजणी होणार आहे.एकूण ३२ फे-यांमध्ये मतमोजणी पूर्ण करण्यात येणार आहे.यासाठी ३०० कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे.निवडणूक मतमोजणी कालावधीत सुरक्षा यंत्रणा कडेकोट ठेवण्यात येणार आहे.दुपारी चार वाजेपर्यंत आष्टी मतदारसंघाचा निकाल स्पष्ट होणार आहे.






## कोण होणार हिंगोली विधानसभेचा आमदार-चार उमेदवाराच्या नावाची चर्चा



तानाजीराव मुटकुळे



रूपालीताई पाटील गोरेगावकर



भाऊराव पाटील गोरेगावकर



रामदास पाटील सुमठाणकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली विधानसभेचे मतदान प्रक्रिया पार पडली असून २३ नोव्हेंबरला निकालाचा उत्साह सर्वांनाच लागला असून हिंगोली विधानसभेवर एकूण २३ उमेदवार रिंगणामध्ये होते २३ उमेदवारापैकी चार उमेदवाराचे पार्ट जोराचे दिसत आहेत, तर हिंगोली विधानसभेवर कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे महायुती कडून तान्हाजीराव मुटकुळे तर महा विकास आघाडी करून रूपालीताई पाटील तर अपक्ष उमेदवार भाऊराव पाटील गोरेगावकर, व रामदास पाटील सुमठाणकर, यांच्या नावाची जोरदार चर्चा होत असून २३ नोव्हेंबरला निकालाची प्रक्रिया पार पडणार असून हिंगोली विधानसभेवर कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे तर हिंगोली विधानसभेमध्ये महायुती व महाविकास आघाडीची जोरदार चर्चा होत आहे, अपक्ष उमेदवारानी मते जास्त मिळवली तर निकालामध्ये मोठा बदल होऊ शकतो, हिंगोली विधानसभेमध्ये महायुती महाविकास आघाडी व अपक्षाची चांगलीच चर्चा होऊ लागली आहे परंतु येणाऱ्या २३ नोव्हेंबरला कोणाच्या गळ्यामध्ये आमदारकीची माळ पडेल याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे,


## कंडारी येथील शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या सुडीला अज्ञात व्यक्ती कडून आग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत)**

एकीकडे विधानसभेचे वार वाहते आहे, आणि एकीकडे शेतकऱ्याच्या गळ्याला सुरू लागल्याची घटना घडली आहे. तालुक्यातील शेवटच्या कडेला असलेल्या कंडारी येथील शेतकऱ्याच्या सोयाबीनच्या गंजिला अज्ञात व्यक्तीने आग लावून दिल्याची माहिती मिळाली आहे.

कंडारी येथील शेतकरी विजय पवार यांची सोयाबीनची सुडी शेतात टाकलेली होती दि. २१ रोजी सकाळी ४ - ५ वाजेच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने सुडिला आग लावून दिल्याची माहिती मिळाली असता शेतकऱ्यांनी धाव घेतली परंतू आगीने रौद्ररूप धारण केलेले असताना हातात काही न लागल्याने सोयाबीनची गंजी पूर्ण राखेत रूपांतरित झाली. या घटनेमुळे शेतकऱ्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. या वर्षी शेतकऱ्यांच्या ५०% उत्पादनात घट झालेली असताना शेतीचा खर्च देखील वसूल होईल याची खात्री नसताना कंडारी येथील शेतकऱ्यावर संकट ओढवले आहे. सोयाबीनची सूडी कोणी जाळली असावी याची माहिती अजून समोर आलेली नाही. परंतु अज्ञात व्यक्तीने मुद्दामून आग लावून दिल्याचे शेतकरी म्हणत आहे. सकाळी सकाळी बाजूने आगीच्या संसर्ग होण्याचा प्रश्न येताच नाही. त्यामुळे कोणी तरी व्यक्तीने मुद्दामून हे कारस्थान केले असावे, सोयाबीन चोरून नेली असती तर कदाचित संपून नुसकान झाले नसते. परंतु आग लावून दिल्याने उपासमारीची वेळ शेतकऱ्यावर आली आहे असे शेतकऱ्यांनी म्हंटले आहे.



**कंडारी येथील सोयाबीनच्या सूडीला लागलेली आग**



देऊळगाव राजा येथील नामांकित पी के इन्स्टिट्युट व श्री मॉडेलिंग फोटो स्टुडिओ चे संचालक प्रदिप कुटे मतदानाचा हक्क बजावतांना मूळ गावी उमरद येथे.. (छाया :- लोकनेता न्युज नेटवर्क सिंदखेड राजा)





'कृष्णा निवास' शहाजीनगर कंधार येथे अवधूत गिरी महाराज डोंगरगावकर यांच्या हस्ते महापूजा करून गृहप्रवेश व शशिकांत इरवंतराव कदम सहशिक्षक दयानंद विद्यालय, हाडोळती यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने त्यांच्या गणगोतानी केला यथोचित सत्कार.

# लोकशाही पत्रकार संघाच्या आष्टी तालुका अध्यक्षपदी अण्णासाहेब साबळे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

अण्णासाहेब साबळे हे अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात काम करत आहेत.त्यांनी अनेक पत्रकार संघात देखील काम केलेले आहे.या त्यांच्या कार्याची दखल घेऊन लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत (बीबी) वैद्य यांनी आष्टी तालुका अध्यक्षपदी अण्णासाहेब साबळे यांची निवड केली आहे.त्यांना लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जाधव मुंबई,राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रदेशाध्यक्ष मंगला वाघ मुंबई,प्रदेश अध्यक्ष माणिक वाघमारे बीड,प्रदेशाध्यक्ष महिला आघाडी निलोफर शेख,प्रदेश उपाध्यक्ष रामदास तपसे केज,वसीम आजाद सिल्लोड,प्रभाकर नडे नांदेड, प्रदेश सचिव हमीद खान जालना, कार्याध्यक्ष आयुब खान पठाण औरंगाबाद,मुंबई प्रदेश अध्यक्ष दत्तात्रय हंडीबाग केज,आत्माराम वाव्हाळ,बिलाल शेख,यांच्यासह ग्रामसेवक संघटना तालुका अध्यक्ष तथा दिव्यांग कर्मचारी संघटना तालुका अध्यक्ष नवनाथ लोंढे यांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

आष्टी तालुका अध्यक्षपदी अण्णासाहेब साबळे यांची निवड केल्यानंतर संस्थापक अध्यक्ष म्हणाले की,लोकशाही पत्रकार संघ पत्रकारांच्या विविध मागण्या शासन दरबारी मांडून मंजूर करून घेणार आहेत.विविध समित्या स्थापन करून आष्टी तालुक्यात सर्वत्र विकास केला जाईल.विविध कार्यक्रम साजरे केले जातील.एक वेगळा ठसा उमटवण्याचा प्रयत्न तालुकाध्यक्ष अण्णासाहेब साबळे यांच्या माध्यमातून केला जाईल. तालुकाध्यक्ष अण्णासाहेब म्हणाले की,लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून अनेक लोकाभिमुख कार्ये करणार असून लोकशाही पत्रकार संघाचे नावलौकिक वाढवेल.आपण माझे वर जो विश्वास दाखविला आहे. त्याचे सार्थक नक्कीच करीन.अशी खात्री मी देईल.यावेळी तेज वार्ता डिजिटल आवृतीचे संपादक निसार शेख,प्रा.बबन उकले,पत्रकार जावेद पठाण,राजेंद्रकुमार ठाकुर,अशोक माने,चंद्रकांत मोरे,रंगनाथ काकडे उपस्थित होते.या सर्वांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904